# दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अकोला
## सन २०२४-२०२५ हिशेब व बँकींग विभागसंबंधी फॉर्म छपाई बाबत
## नियम व अटी

१) बँकेला खालील प्रमाणे फॉर्म छपाई करावयाचे आहेत.
   १) मुदती ठेव खाते ओपनींग फॉर्म ५०,००० नग
   २) बचत ठेव खाते चेक लिस्ट फॉर्म १,५०,००० नग
   ३) एचयुएफ ठेव खाते चेकलिस्ट फॉर्म १००० नग ,
   ४) प्रोप्रायटरशिप ठेव खाते चेकलिस्ट फॉर्म १०,००० नग
   ५) ट्रस्ट ठेव खाते चेक लिस्ट फॉर्म १००० नग
   ६) भागीदारी ठेव खाते चेकलिस्ट फॉर्म १००० नग
   ७) कंपनी ठेव खाते चेकलिस्ट फॉर्म १००० नग

२) वरील प्रमाणे फॉर्म नं.१ छपाई करीता बल्लारपूर लेजर पेपर ७० ग्रॅम तसेच अ.नं.२ ते ७ वरील फॉर्म छपाई करीता शिरपूर व्हाईट क्रिमिओ ५८ ग्रॅम पेपर वापरावा.

३) निविदा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कचेरी, सिव्हील लाईन, अकोला. या नावाने पाठवावीत.

४) सशर्त निविदा पाठवु नये सशर्त निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

५) छपाईचा नमुना दि. 06/07/2024 पासून कार्यालयीन वेळात बँकेच्या स्टेशनरी विभागात पाहावयास मिळेल. नमुना काळजीपूर्वक पाहुनच दर भरावेत, लॉटचे दर भरू नये. त्यानंतर कोणत्याही सबबीवर वाढीव दर मंजूर केले जाणार नाहीत.

६) निविदा मधील दर सर्व टॅक्सेससह असावेत. निविदा भरणारे पार्टीजवळ जीएसटी नंबर असणे आवश्यक आहे. निविदा संबंधीत फर्मचे नावाने असलेल्या लेटर पॅडवरच प्रोप्रायटरचे स्वाक्षरी सह असावी.

७) निविदे सोबत कागदाचा नमुना सादर करावा लागेल. त्यावर पेपरचा तपशिल निविदा धारकाचे नाव, सही असणे आवश्यक राहील. पेपरचा नमुना नसलेले निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

८) छपाई काम दिलेल्या मुदतीत पुर्ण करून न दिल्यास १०% रक्कम दंड म्हणुन बिलातुन कपात करण्याचा बँकेस अधिकार राहील व कपात केलेली रक्कम परत दिली जाणार नाही.

९) छपाई काम नमुन्यानुसार समाधानकारक नसल्यास अगर त्यामध्ये कोणतीही उणीव असल्यास छपाई पुर्णत: नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील. त्याबाबत नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही.

१०) छपाईची ऑर्डर दिल्यानंतर ठरलेल्या मुदतीत छपाई न पुरविल्यास सदर छपाई ईतरांकडुन करून घेण्यात येईल व त्या अनुषंगाने होणारा सर्व प्रकारचा अतिरिक्त खर्च छपाई काम मंजूरात असलेल्या निविदा दाराकडून वसुल करण्यात येईल.

११) दिलेल्या ऑर्डर प्रमाणे छपाई करुन एकाच वेळी बँकेत द्यावे लागेल, अपूर्ण ॲटम स्विकारण्यात येणार नाही..

१२) छपाई ऑर्डर पुरविणेस कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही.

१३) छपाई ऑर्डर पोटी ॲडव्हान्स मिळणार नाही.

१४) छपाई निविदा भरले पासून सदर दर ९० दिवस वैध राहतील. सदर कालावधीत बँकेच्या आवश्यकतेनुसार ऑर्डर देण्यात येईल. सदर दर आपणास बंधनकारक राहतील.

१५) अंतिम छपाई पूर्वी प्रुफ तपासुन छपाई करण्यात यावी.
छपाई निविदा भरतांना दर हे जीएसटीसह नमुद असावेत. बिल सादर करतांना बिलावर जीएसटी नंबर नमुद असावा.

१६) कोणतीही निविदा मंजूर करणे, नामंजूर करणे, निविदा कुठलेही कारण न देता रद्द करणे, अटी व शर्तीत बदल करणे बाबतचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.

निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.- 10/7/2024
वेळ दुपारी ५.०० वाजे पर्यंत.

The Akola-Washim Dist.C.Co-op.Bank Ltd. H.O. AKOLA

मुख्य कार्यकारी अधिकारी

Estate.Record/34